ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 11 | AUGUST - 2017

REVIEW OF RESEARCH

# ७३ व्या घटनादुरुस्तीतून पंचायत राज व्यवस्थेत स्त्रीयांना मिळालेले स्थान



**अश्विनी गोविंदराव भालेकर**
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

**प्रस्तावना :**

लोकशाही व्यवस्थेची व भारतीय समाजाची सहसंबंधाची मोठी परंपरा भारत या भूखंडात दिसून येते. भारतीय समाजाची जडणघडणाची प्रक्रिया प्रामुख्याने लोकशाही नितीमुल्यांच्या चौकटीत झाल्याचे दिसुन. स्वातंत्र्य, समता, लोकशाही, न्याय या उदारमतवादी संकल्पनाचा उदय युरोपीय भुमित झाला असला तरी भारतीय समाजहितातून त्याला नवा पंथाबरोबरच स्त्री-पुरुषामधील असलेली वैविध्यता व समाज जीवन एकसंघ ठेवण्यासाठी वरील संकल्पनेला विशेष महत्त्व प्राप्त होते. साधारणतः या उदारमतवादी संकल्पनामधून समता प्रस्थापित होणे क्रमप्राप्त ठरत असून देखील स्वयं स्वार्थ प्राप्तीसाठी विशिष्ठ एका गटाकडून झालेले समाजातील विविध स्तरीय अतीक्रमन असमतेचे वातावरण निर्मितीस कारणीभूत ठरत असते. त्यातच धर्म संस्कृतीतून पुरुषी मानसिकतेच्या प्रवृत्तीचे होणारे प्रदर्शन समाजातील मोठ्या व महत्त्वाच्या अशा स्त्री घटकावर अन्याय करुन लोकशाही, समता व स्वातंत्र्य या मूल्यापासून त्यांना परागंधा करण्यास कारणीभूत ठरते.

भारतात असंख्य काळापासुन समाजातील सर्व स्तरावर पुरुषांचे असलेले वर्चस्व निरंतर व प्रत्येक काळात दिसुन येते. लोकशाही व्यवस्थेमध्ये सर्वांना समान मिळणाऱ्या अधीकारात देखील गदा आणण्याचे कार्य या पुरुषीमानसिकतेतुन झालेले दिसुन येते याच मानसिकतेतून स्त्रीयांना राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक इ. अशा अनेकविध विकासाच्या व स्वयं उन्नतीच्या मार्गापासून दूर रहावे लागते. खऱ्या अर्थाने समता निर्माण होण्यासाठी समाजातील स्त्री-पुरुष या दोन्ही घटकांचा विकास होणे परिहार्य आहे. परंतु एकंदरीत भारतातील सामाजिक परिस्थिती व धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक नितीमुल्यांच्या निर्मितीतुन महिलांना मिळालेला दुय्यम व कमी दर्जाचे स्थान त्यांच्या सार्वत्रिक विकासाच्या प्रक्रियेत प्रमुख अडथळा निर्माण करताना दिसतात.

ब्रिटीशांच्या भारतीय वास्तवातुन निर्माण झालेल्या नवमुल्यांची जोपासना स्वतंत्र भारताच्या प्रशासनात व कारभारात दिसुन येते. समता, लोकशाही, न्याय या उदारमतवादी विचारांची प्रस्तावना भारतीय समाजात होतांनाच स्वतंत्र भारताच्या संविधानातुन या मुल्यांना आधार व प्रमाणिकरण प्राप्त झाले. ज्यातुन भारतीय समाजापुढे निर्माण होतांना दिसुन येते. भारतीय समाजातील वैविध्यपुर्ण निर्माण होतांना दिसुन येते. भारतीय समाजातील वैविध्यपुर्ण समुहांना व वंचीत, शोषीत गटांना तसेच स्त्रीयांना समान अधिकार प्राप्त होईन सर्वसामावेशक विकासातुन समता निर्माण होण्यासाठी स्त्रीयांना मिळालेला राजकीय हक्क हे या संवैधानिक मार्गाचीच फलनिष्पती असल्याचे दिसुन येते.

समाजाचा सर्वांगीण विकास होऊन समता निर्मित्यासाठी सर्व स्तरातील विकास महत्त्वाचा आहे. हे लक्षात होऊन महिलांचे राजकीय अधिकार विशिष्ट स्थान प्राप्त करतात. स्त्रीयांना राजकीय आरक्षणातुन संधी देऊन त्यांचे प्रतिनिधीत्त्व निर्माण करण्याचे प्रयत्न चालू असतांना, स्त्रीयांचे राजकीय आरक्षण हे फक्त औपचारिक म्हणून पाहणारा पुरुष वर्ग मोठ्या प्रमाणात होता. परंतु राजकीय हक्क हे स्त्रीयांसाठी औपचारिक नसून जिवनातील सर्व अंगाशी समरुप असा अधिकार असल्याचे दिसते. मतदान करणे, राजकारणात प्रतिनिधीत्त्व करणे, राजकीय पक्ष स्थापन करणे, मत मांडणे यासारखे राजकीय क्रिया प्रक्रियांशी संबंधीत असलेला घटना महत्त्वाच्या असून त्या स्त्रीयांना स्वयं विकासासाठी प्रवृत्त करणाऱ्या अशाच आहेत.

स्वतंत्र भारताच्या प्रशासनात व राजकीय वातावरणात स्त्रीयांना सहभाग हा अल्पसा दिसुन येतो. भारतात झालेल्या एकुण सार्वत्रिक निवडणूकीत व स्थानिक प्रशासनात स्त्री प्रतीनिधींची संख्या नगण्य अशीच आहे त्यातच स्थानिक स्वराज्य संस्थाच्या माध्यमातुन लोक

सहभागाची संकल्पना खऱ्या अर्थाने पुर्णत्त्वास येते. जनतेचे राजकीय समाजीकरण होण्यास या संस्थातून त्यांचे राजकीय मतप्रदर्शन होते क्रमप्राप्त ठरते. हा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीकोनातून व स्त्रीयांच्या राजकीय अधिकारांना अधिकाधिक प्रमाणित करण्याच्या उद्देशाने भारतीय संविधानात झालेल्या ७३ व्या घटनादुरुस्तीचे अधिक महत्व आहे. समर्पक असा लोकसहभाग घडवून भारतीय राजव्यवस्था सुदृढ करण्यासाठी पंचायत राज व्यवस्थे या घटनादुरुस्तीने मान्यता मिळण्याबरोबर स्त्रीयांना मिळालेले राजकीय आरक्षण भारतीय समाजात लोकशाहीमुल्य रुजविण्यास्तव मौलाचा दगड ठरल्याचे दिसुन येते.

## ७३ वी घटनादुरुस्ती :

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीयांनी स्वीकृत केलेले संविधान परिपुर्ण असे असुन त्यात अंतर्भुत असलेली घटनादुरुस्ती पद्धत महत्त्वाची आहे. भारतीय राज्यघटनेत अनेक महत्त्वपुर्ण घटनादुरुस्त्या करण्यात आल्या, त्यातच १९९३ साली झालेल्या ७३ व्या घटनादुरुस्तीला विशेष महत्त्व देण्यास आले. या घटनादुरुस्तीला काही लोकांनी दुसरे स्वातंत्र्य म्हणून देखील संबोधले.

स्वातंत्र्य भारताच्या प्रशासनात घटनात्मक तरतुदीनुसार पंचायतराज व्यवस्थेची निर्मिती करण्यास व पंचायतराज व्यवस्था अस्तित्त्वात आणण्याविषयीची आवश्यक नियम आहेत. ते मार्गदर्शक तत्त्वामध्ये कलम ४० मध्ये अंतर्भुत करण्यात आलेले आहेत. घटनाकारांनी स्थानिक प्रशासनाला मान्यता देण्याविषयक व त्यांचा विस्तार करण्यासाठीचे नियम यात नमूद केलेले असून या नियमांतर्गत राहून शासन कधीही या संदर्भात कायदे व दुरुस्त्या करु शकते असे स्वातंत्र्य नमूद केलेले आहे. प्रामुख्याने पंचायत राज व्यवस्थेविषयी राज्य शासनाचे असलेले उदासीन धोरण व त्यातुन खुंटत चाललेला खेड्यांचा विकास पाहता यात बदल करण्यासंदर्भात केंद्रात हालचाली होते क्रमप्राप्त ठरले. त्यातून नवीन नियमांची निर्मिती करुन पंचायत राज व्यवस्था सुदृढ करण्यासाठी प्रयत्न केले गेले.

पंचायत राज व्यवस्थेला बळकटीकरण प्राप्त करुन ग्रामीण स्तरावर सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी अनेकविध लहान मोठे प्रयत्न झ ाालेत. परंतु तत्कालीन पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव सरकारने २२ डिसेंबर १९९२ रोजी लोकसभेत पंचायतराज विधेयक मांडले. या विधेयकाला संयुक्त संसदीय समितीकडे सोपविले. लोकसभेने संमती दिल्यानंतर २३ डिसेंबर १९९२ रोजी राज्यसभेने या विधेयकास मान्यता दिली. २० एप्रिल १९९३ रोजी राष्ट्रपतींच्या संमतीनंतर पहिल्यांदा पंचायतराज व्यवस्थेला यातुन घटनात्मक दर्जा मिळाला.

प्रशासनाच्या दृष्टीकोनातून सर्व अधिकार प्राप्त होऊन पंचायत राज व्यवस्थेला नवा आयाम यातून प्राप्त झाला. संविधानातील कलम २४३ मध्ये पंचायतराज व्यवस्थे विषयी तरतुद करुन संविधानात ११ वे परिशिष्ट निर्माण करण्यात आले. त्यात पंचायत राज व्यवस्थेचे कामकाजाचे सर्व निश्चित करण्यात आले. ७३ व्या घटनादुरुस्तीनंतर सर्व राज्यांनी १९९६ पर्यंत पंचायत राज विधेयक संमत करणे आवश्यक होते. महाराष्ट्र शासनाने या अनुषंगाने १९९४ साली ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार अपेक्षित बदल केले.

## ७३ व्या घटना दुरुस्तीमधील महत्त्वाच्या तरतुदी :

या घटनादुरुस्तीच्या माध्यमातुन केल्या गेलेल्या तरतुदीतून प्रामुख्याने पंचायतराज व्यवस्थेचे स्वरूप सुनिश्चित करण्यात आले आणि या संस्था मधील विविध आरक्षणाचे उल्लेख त्यात स्त्रीयांच्या राजकीय आरक्षणाचा प्रामुख्याने सहभाग करण्यात आला. या घटनादुरुस्तीतील काही मुलभुत तरतुदी खालील प्रमाणे -

१) पंचायत राजची रचना ही त्रिस्तरीय असेल. जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद, तालुका स्तरावर पंचायत समिती आणि ग्रामीण भागात ग्राम पंचायत असे हे तीन स्तर असतील.

२) ग्रामसभा हा पंचायतराज व्यवस्थेचा आधार असेल. गावातील सर्व प्रौढ नागरिकांची मिळून ग्रामसभा तयार होईल. या ग्रामसभेचे अधिकार व कार्य त्या-त्या राज्यांच्या विविधतळाच्या मान्यतेवर अवलंबून असेल.

३) दर पाच वर्षांनी प्रौढ मताधिकाराच्या आधारावर पंचायतीच्या निवडणुका होतील. परिस्थितीनिहाय पंचायत बरखास्त झाल्यास सहा महिन्याच्या आज निवडणुका घेण्यात येतील.

४) सरपंच, पंचायत समितीचे सभापती, जिल्हा परिषद अध्यक्ष या प्रत्येक पातळीवरील कमीत कमी एक तृतीयांश पदे महिलासाठी आरक्षित राहतील.

५) पंचायत राज व्यवस्थेतील तीनही स्तरावर एकुण जागांच्या प्रमाणात १/३ पेक्षा कमी नाही इतके आरक्षण महिलांसाठी ठेवावे.

६) अनुसूचित जाती व जमातींना एकुण दिलेल्या पंचायत संस्थेमधील आरक्षणात १/३ इतके सदस्य व सभासद या त्या-त्या प्रवर्गांतील महिलांसाठी राखीव असतील.

अशा प्रकारे महिलांना आपल्या अधिकारांची प्राप्ती होवून त्यांचा राजकीय व प्रशासनिक विकास होऊन सहभाग वाढविण्याच्या दृष्टीकोनातून महत्त्वाच्या तरतुदी या घटनादुरुस्तीत करण्यात आलेल्या आहेत.

**स्त्रीयांचे राजकीय सहभागीत्व :**

अधिकारांची विभागणी न्याय स्वरुपात होण्यासाठी स्त्रीयांना मिळालेला राजकीय अधिकार व हक्क महत्त्वाचा असा आहे. बहुतांश काळ महिलांचा राजकीय सहभागाविना गेला. प्रामुख्याने ग्रामीण महिलांना राजकारणात व सत्तेत मतदानाव्यतिरिक्त स्थान नव्हते. ७३ व्या घटनादुरुस्तीतून मिळालेल्या आरक्षणाद्वारे महिलांचा सत्तेत सहभाग पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणात मिळाला. एकुण आरक्षित मतदारसंघापैकी एक तृतीयांश मतदारसंघ अनुसूचित जाती व जमातीतील करण्यात आली. याबरोबरच एकूण प्रत्यक्ष निवडून येणाऱ्या प्रतिनिधींची संख्या लक्षात घेऊन या संख्येच्या प्रमाणात एक तृतीयांश जागा महिलासाठी आरक्षित ठेवण्याची तरतूद यात करण्यात आली आहे.

महिलांना स्थानिक पातळीवर प्रतिनिधीत्त्व करण्यासाठी संधी देतांनाच पंचायत व्यवस्थेमधील महत्त्वाच्या पदासाठी देखील आरक्षण निश्चित करण्यात आले. कलम २४३ (डी) (४) व (टी) (४) नुसार अध्यक्षपदासाठी आरक्षण निर्माण करण्यात आले. तसेच अनुसुचित जाती-जमातींच्या महिलांना आरक्षण देतांनाच विमुक्त व भटक्या जाती व जमाती आणि इतर मागासवर्गीय यांचा समावेश करुन त्यांना देखील २७ टक्के जागा आरक्षित ठेवण्यात आल्या. पंचायत राज व्यवस्थेत ग्रामीण महिलांचा राजकिय सहभाग वाढविण्यासोबतच त्यांना प्रमुख म्हणजेच ग्रामपंचायत मधिल सरपंच, पंचायत समिती मधील सभापती व जिल्हा परिषदेमधील जिल्हा अध्यक्ष या महत्त्वाच्या पदावर विराजित करण्यासाठी देखील महत्त्वाचे आरक्षण निर्माण करण्यात आले.

७३ व्या घटनादुरुस्तीनुसार पंचायत राज व्यवस्थेला संवैधिनिकता प्राप्त करुन देत स्थानिक प्रशासनात स्त्रीयांना ३३% आरक्षण देणारा भारत हा पहिला एकमेव देश ठरला. राजकारणत महिलांचा सहभाग करुन घेत मुलभुत विकासाचा मार्ग निर्मिणारा विकसित देश म्हणून घटक राज्यांनी देखील मोलाचे सहकार्य दिले. बऱ्याच राज्यांनी ७३ व्या घटनादुरुस्तीपुर्वी राज्यांतर्गत महिलांना दिलेल्या राजकीय आरक्षणाचे फायदे दिसुन येतात. यात कर्नाटकात (१९८७) स्त्रियांसाठी २५% राखीव जागा दिलेल्या होत्या. राज्याच्या प्रयत्नातून व भारतीय राज्यघटनेच्या चौकटीत राहून मिळालेले राजकीय आरक्षण महिलांच्या विकासांचा प्रमुख मार्ग म्हणून सिद्ध झालेले दिसते.

परंपरागत राजकीय संस्कृतीतून निर्माण झालेल्या परिस्थितीत महिलांना फक्त मतदान एवढ्या सिमित प्रमाणात राजकीय सहभाग घेता येत होता. परंतु ग्रामीण भागातील महिलांना राजकीय मत व्यक्त करण्याबरोबर विविध पदावरुन आपली निर्णय क्षमता दाखविण्याचे व प्रशासनातून आपला विकास साध्य करण्याचे कौशल्य सदर आरक्षणामुळे मिळाले.

ग्रामीण भागातील बहुसंख्यांक महिलांची प्रगती खुंटलेली अशीच दिसुन येते. अनुसुतिच जाती-जमाती व भटक्या विमुक्त, इतर मागासवर्गातील स्त्रियामध्ये अशिक्षित व अज्ञानी पत्रान्वये प्रमाण देखील अधिक दिसते. त्यातच पुढारलेला वर्ग व सवर्णाकडुन होणारी स्त्रयांची मानहाणी त्यांच्या विकासाला बाधक ठरतांना दिसते. राजकीय क्रिया प्रक्रियात व नितीनिर्धारणात पुरूषी मानिसकतेचे असलेल्या प्राबल्यामुळे महिलावर मोठा अन्याय होऊन त्या आपल्या हक्कापासून वंचित राहत घडविण्याच्या दृष्टीकोनातुन व महिलांच्या सार्वत्रिक विकास घडविण्याच्या उद्देशाने ७३ वी घटनादुरुस्ती व त्यातुन मिळालेले अधिकार महत्त्वाचे ठरतात.

**संशोधन सुत्र :**

समाजाच्या जडणघडणीत पुरुष जिवनाच्या बहुतांश घटकांवर आपला प्रभाव निश्चित करीत असते. अशातच महत्त्वाच्या असलेल्या राजकीय क्षेत्रात स्त्रीयांना मिळालेले दुय्यमत्त्व त्यांच्या अवनतीला कारणीभुत ठरते. समाजातील दुभंगलेली ही स्थिती सुधारण्यासाठी भारतीय परिघात १९९३ साली झालेली घटनादुरुस्ती महत्त्वाची ठरते. यातुन महिलांना मिळालेली स्वतंत्र राजकीय स्थिती व आरक्षणाचे महत्त्व लक्षात घेता सदर संशोधन विषयात यातील तथ्य मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**निष्कर्ष :**

ग्रामीण भागातील बहुतांश अशिक्षित, अडानी महिलांना आपल्या राजकीय क्षेत्रात स्थीर-स्थावर करतांनाच महत्त्वपूर्ण ठरलेल्या या घटनादुरुस्तीच्या अभ्यासातून व महिलांच्या योगदानातून खालील निष्कर्ष संभावतात

१) स्त्रीयांच्या राजकीय सहभागात मतदानाव्यतिरिक्त अनौपचारिकता निर्माण होऊन प्रतिनिधी म्हणून उभे रहाणे, मतप्रदर्शित करणे, पक्ष स्थापने, निर्णय प्रक्रियेत भाग घेणे इ. जीवनावश्यक गतीविधींचा समावेश या घटनादुरुस्तीतून निर्धारीत होतांना दिसतो.

२) राजकारण हे फक्त पुरुषांच्या मक्तेदारीचे स्थान असल्याच्या परिस्थितीत राजकीय आरक्षणाच्या माध्यमातून स्त्रीयांचे सबलीकरण होऊन त्यांना आपल्या मुलभुत अधिकाराची प्रस्तावना करणे शक्य झाले.

३) ग्रामीण भागातील महिलामध्ये आत्मविश्वासाची भावना बळावून विविध पदापर्यंत त्यांना पेहचविण्यास या आरक्षणातून एक स्थैर्य प्राप्त झाले.

४) आरक्षित जागेवर निवडून आलेल्या महिला उमेदवारांच्या निर्णयावर बहुतांश जागी पुरुष वर्गाचे वर्चस्व दिसुन येते.

**समारोप :**

परंपरागत नितीमुल्यांतुन निर्माण होणाऱ्या जीवनप्रणालीत स्त्रीयांना दुय्यमत्त्वाची भावना मिळालेली असतांना त्यांच्या विकासाचा मार्ग संवैधानिक राजकीय आरक्षणातुन प्राप्त होणे भारतीय समाजात महत्त्वाचे असे आहे. पंचायतराज व्यवस्थेतून ग्रामीण जनजीवनाचे प्रातीनिधीक स्वरूपात होणारे समायोजन महिलांच्या सहभागाने पुर्णत्त्वास आल्याचे दिसून येते. ७३ व्या घटनादुरुस्तीने महिलांना मिळाले आरक्षणातुन समाजातील सुस्थीर वातावरण निर्मित होऊन निधीनिर्धारण प्रक्रिया सर्वासमावेशक झाली, असे म्हणता येईल.

**संदर्भ :-**

१) आलोचना ३- पंचायत राज जुने नवे, स्त्री अभ्यास संशोधन केंद्र पुणे.
२) विद्युत भागवत, रेगे शर्मिला, भारतातील समकालीन कळीचे प्रश्न स्त्रीवादी चर्चा विश्वाचा आढावा, स्त्री अभ्यास केंद्र पुणे विद्यापीठ, डिसेंबर २००१.
३) परदेशी प्रतिमा, स्त्रीमुक्तीचे विविध प्रवाह, सावित्रीबाई फुले प्रकाशन पुणे.
४) काचोळे दा.धो., ग्रामिण आणि नागरी समाजशास्त्र, कैलाश प्रकाशन, औरंगाबद. २००३
५) दत्त विजय रंजन, पंचायत राज : संकल्पना आणि वर्तमान स्वरुप, सर्वसेवा संघ प्रकाशन वर्धा, १९९७.